# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दुरध्वनी कः.०२५१- २७२०११९ विस्तार क्रः. २३९ फॅक्सः.०२२-२७४५२२३३
ईमेल:

द जा.क्र/उमपा /अग्री ____ /____/2021 दिनांक:- ___/ ____/2021

प्रति,-
--
deepak kishor tari
12
--------------------------------------
--------------------------------------

**विषय :सार्वजनिक गणेश उत्सव २०१९ निमित अग्निशमन दलाचा न हरकत दाखला मिळणेबाबत**

**संदर्भ : आपला दिनांक 2021-09-03 रोजीचा अर्ज आवक क्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 234 अन्वये, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका हद्दीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्गावरील गुजराथी शाळेच्या मैदानावर, भिवंडी, ठाणे, या ठिकाणी लांबी 13 X रुंदी 30 या मापाचे सार्वजनिक गणेश उत्सवाकरीता खालील अटी / शर्ती नुसार मंडप उभारण्यास महानगरपालिकेची हरकत नाही.

| | |
|---|---|
| 1 | सदर तात्पुरता ना हरकत दाखला मुदत दि 2021-09-10 ते 2021-09-14 पर्यंत देणेत येत आहे. |
| 2 | संबंधित पोलिस स्थानकाची परवानगी घेणे आपणांस बंधनकारक राहिल. |
| 3 | नियमानुसार व कायद्यानुसार आवश्यक असणारे सर्व परवाने संबंधित विभागाकडुन घेतल्यांनतरच सदर परवाना ग्राह्य राहील. |
| 4 | सर्व दिशांना पेंडालची (मंडप) उंची 3 मीटर पेक्षा कमी नसावी. |
| 5 | मंडपामध्ये ज्वालाग्रही वस्तुंचा साठा ठेवू नये. |
| 6 | मंडप बसविणेकरिता सिथेंटिक सामग्री उदा. कापडा, रस्सी यांचा उपयोग करणेत येवू नये. |
| 7 | मंडप विजेच्या तारांच्या खाली उभारण्यात येवू नये. |
| 8 | रेल्वेपटरी, विद्युत सबस्टेशन, चिमणी, भट्टी पासून कमीत कमी 15 मीटर दूर अंतरावर मंडप उभारण्यात यावा. |
| 9 | बाहेर जाण्याचे गेट कमीत कमी 5 मीटर रुंद असावे, जर गेट अर्ध गोलाकार आकाराचे असेल तर गेटची जमीनीपासूनची उंची 5 मीटर पेक्षा कमी नसावी. |

| | |
|---|---|
| 10 | बाहेर जाण्याचे कमीत कमी दोन रस्ते असावेत. शक्यतो दोन्ही रस्ते एकमेकांच्या विरुध्द दिशेला असावे. |
| 11 | बाहेर जाण्याचे गेट पर्याप्त संख्येत असावेत. जेणेकरुन मंडपातील कोणत्याही स्थानावरुन व्यक्तीला बाहेर पडण्यासाठी 15 मीटर पेक्षा जास्त अंतर असावे. |
| 12 | खुर्च्या किना-यापासून 1.2 मीटर जागा सोडून लावण्यात याव्यात. तसेच 12 खुर्च्यानंतर 1.5 मीटर जागा सोडण्यात यावी. त्या नंतर पुन्हा 12 खुर्च्या लावू शकता. खुर्च्याच्या 10 रांगेनंतर 1.5 मीटर जागा सोडण्यात यावी |
| 13 | खुर्च्या कमीत कमी चार चारच्या संख्येत बांधून जमीनीमध्ये लोखंडी शिग गाडून त्या शिगेस बांधण्यात याव्यात जेणेकरून गडबड गोंधळ झाल्यास खुर्च्या अव्यस्थित होऊन बाहेर पडण्याच्या मार्गात अडथळा निर्माण करतील |
| 14 | इलेक्ट्रीक वायरची जोड खुले नसावेत, तर पोर्सलिन कनेक्टरांचा उपयोग करणेत यावा |
| 15 | इमरजन्सी लाईटची व्वस्था करणेत यावी. |
| 16 | विद्युतचे कोणतेही सर्कीट , बल्ब, टयुब लाईट व इतर मंडपाच्या कोणत्या ही भागापासून कमीत कमी 15 से.मी. दूर असावे. |
| 17 | हॅलोजन लाईटचा वापर मंडपात करणेत येवू नये |
| 18 | मंडपामध्ये जेवण् वगैरे बनविण्यात येवू नये, अर्थात शेगडी, भटटी चुलचा वापर करणेत येवू नये. जर बनविणे गरजेचे असेल तर मंडपापासून दूर आणि पत्राचे शेड मध्ये बनवावे. |
| 19 | मंडपाचे आगीपासून संरक्षण करणेकरीता प्रती. चौरस मीटरला 0.75 लि. याप्रमाणे पाण्याचा साठा करणेत यावा. सदर पाणी ड्रम वा बादलीमध्ये सुरक्षित ठेवावे व त्याचा उपयोग अग्निशमन शिवाय इतर कोणत्या ही कार्यासाठी करू नये. एकूण पाण्याच्या अर्धा साठा मंडपाच्या आत व अर्धा साठा मंडपाच्या बाहेर ठेवण्यात यावा. |
| 20 | 50 वर्ग मीटरसाठी दोन बादली पाणी व 100 वर्ग मीटर एरीयासाठी 01 वॉटर टाईप फायर एक्सटीग्युंशर क्षमता 9 लि. या प्रमाणे आगीपासून संरक्षण करणेकामी मंडपात ठेवणेत यावेत. |
| 21 | विद्युतच्या आगीपासून संरक्षण करणेकरीता एक कार्बनडाय ऑक्साईड फायर एक्सटीग्युंशर अथवा ड्राई केमिकल पावडर फायर एक्सटीग्युंशर स्विच गिअर, मेन मीटर व स्टेज जवळ ठेवणेत यावेत. |
| 22 | मंडपामध्ये किंवा मंडपाच्या बाहेर फटाके वाजवू नयेत. |
| 23 | मंडपामध्ये किंवा मंडपाजवळ धुम्रपान करू नये NO SMOKING व धुम्रपान करू नये असा बोर्ड लावण्यात यावेत. |

| | |
|---|---|
| 24 | मंडपासाठी वापरणेत आलेला कपडा “अग्निरोधक” मिश्रणामध्ये भिजवून नंतर त्याचा वापर करावा. |
| 25 | आवश्यकतेनुसार 24 तास सुरक्षा रक्षकाची नियुक्ती करणेत यावी. |
| 26 | ठरवून दिलेल्या तारखेनंतर सदर दाखला रदद समजण्यात येईल. |
| 27 | मा. उच्च् न्यायालयाचे आदेशान्वये “शांतता क्षेत्रामध्ये” ध्वनी प्रदुषण होणार नाही यांचे पालन करणे बंधनकारक आहे. |

उपरोक्त परवानगी मध्ये अटी व शर्तीचा भंग झाल्यास दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल.

**मुख्य् अग्निशमन अधिकारी**

**अग्निशमन विभाग**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**